भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# हिंदु विवाह (कार्यवाही विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६०

(१९६० चा अधिनियम क्रमांक १९)

[दिनांक १ जून १९९३ रोजी यथाविद्यमान]

# The Hindu Marriages (Validation of Proceedings) Act, 1960

**(Act No. 19 of 1960)**

[As in force on the 1st June 1993]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४
[किंमत : रु. १.९० पैसे]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ जून १९९३ रोजी यथाविद्यमान असलेला हिंदू मॅरेजेस (व्हॅलिडेशन ऑफ प्रोसीडींग्स) ॲक्ट, १९६० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५, अंक १, दिनांक २३ जून १९९४ यात पृष्ठ २९ वर प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली, दिनांक २३ जून १९९४.

---

# PREFACE

This edition of the Hindu Marriages (Validation of Proceedings) Act, 1960 as on the 1st June 1993 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, section 1, No. 1, Vol. 5, dated 23rd June 1994 on page 29.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
dated 23rd June 1994.

एच ४२२५ (१०२१—१-९५)

# हिंदू विवाह (कार्यवाही विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६०

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. विवक्षित न्यायालयांमध्ये १९५५ चा अधिनियम २५ याखाली केलेल्या कार्यवाही विधिग्राह्य करणे.

शब्दसूची :
मराठी—इंग्रजी
इंग्रजी—मराठी

# हिंदू विवाह (कार्यवाही विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६०

(१९६० चा अधिनियम क्रमांक १९)

[१ जून १९९३ रोजी यथाविद्यमान] [६ मे १९६०]

## 'हिंदू विवाह अधिनियम, १९५५' खालील विवक्षित कार्यवाही विधिग्राह्य करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमास 'हिंदू विवाह (कार्यवाही विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६०' असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

विवक्षित न्यायालयांमध्ये १९५५ चा अधिनियम २५ याखाली केलेल्या कार्यवाही विधिग्राह्य करणे.

२. (१) अधिकारितेचा 'हिंदू विवाह अधिनियम, १९५५' (१९५५ चा २५) याखाली वापर करणाऱ्या किंवा तसे म्हणून वापर करणाऱ्या, पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या सर्व कार्यवाही आणि केलेले हुकूमनामे व आदेश हे, कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश काहीही असला तरी, जणू काही अशा अधिकारितेचा वापर करणारे किंवा तसे म्हणून वापर करणारे न्यायालय उक्त अधिनियमाच्या अर्थानुसार जिल्हा न्यायालय असावे अशाप्रकारे विधितः निर्दोष व ग्राह्य असल्याचे मानले जाईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली न्यायालये पुढीलप्रमाणे आहेत, ती अशी :—

अपर न्यायाधीशाचे, अपर जिल्हा न्यायाधीशाचे, सह जिल्हा न्यायाधीशाचे, सहायक जिल्हा न्यायाधीशाचे, सहायक न्यायाधीशाचे न्यायालय व कोणत्याही नावाने ओळखले जाणारे दुय्यम न्यायाधीशाच्या न्यायालयाहून कमी दर्जा नसणारे अन्य कोणतेही न्यायालय.

# हिंदू विवाह (कार्यवाही विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६०

# THE HINDU MARRIAGES (VALIDATION OF PROCEEDINGS) ACT, 1960

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिनियमित करणे | enact | [उद्देशिका] |
| अपर जिल्हा न्यायाधीश | additional district judge | [क.२(२)] |
| अपर न्यायाधीश | additional judge | [क.२(२)] |
| (–च्या) अर्थानुसार | within the meaning of | [क.२(१)] |
| दुय्यम न्यायाधीश | subordinate judge | [क.२(२)] |
| निर्दिष्ट करणे | refer to | [क.२(१)] |
| –म्हणून वापर करणारे | purporting to exercise | [क.२(१)] |
| विधिग्राह्य करणे | 1. validate | [उद्देशिका] |
| | 2. validation | [संक्षिप्त नाव] |
| विधित: निर्दोष व ग्राह्य | good and valid in law | [क.२(१)] |
| विवक्षित | certain | [उद्देशिका] |
| वापर करणे | exercise | [क.२(१)] |
| संसद | Parliament | [उद्देशिका] |
| संक्षिप्त नाव | short title | [क.१ स.टी.] |
| सह जिल्हा न्यायाधीश | joint district judge | [क.२(२)] |

# THE HINDU MARRIAGES (VALIDATION OF PROCEEDINGS) ACT, 1960

# हिंदू विवाह (कार्यवाही विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६०

## इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| additional district judge | अपर जिल्हा न्यायाधीश | [ S.2(2) ] |
| additional judge | अपर न्यायाधीश | [ S.2(2) ] |
| certain | विवक्षित | [ Preamble ] |
| enact | अधिनियमित करणे | [ Preamble ] |
| exercise | वापर करणे | [ S.2(1) ] |
| good and valid in law | विधित: निर्दोष व ग्राह्य | [ S.2(1) ] |
| joint district judge | सह जिल्हा न्यायाधीश | [ S.2(2) ] |
| Parliament | संसद | [ Preamble ] |
| purporting to exercise | –म्हणून वापर करणारे | [ S.2(1) ] |
| refer to | निर्दिष्ट करणे | [ S.2.(1) ] |
| short title | संक्षिप्त नाव | [ S. 1-m.n. ] |
| subordinate judge | दुय्यम न्यायाधीश | [ S.2(2) ] |
| validate | विधिग्राह्य करणे | [ Preamble ] |
| validation | विधिग्राह्य करणे | [ Short title ] |
| within the meaning of | (–च्या) अर्थानुसार | [ S.2(1) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई